एकाक

लीळाचरित्र हा ग्रंथ एकाक,पूर्वार्ध व उत्तरार्ध याप्रमाणे तीन भागांत विभागलेला आहे. त्यापैकी एकाक ह्या भागात साधारण ७४ लीळा आहेत. एकाक ह्या भागात चक्रधरस्वामींच्या जीवनाचा पूर्वभाग आलेला आहे. एकाक हा भाग उत्तरार्ध व पूर्वार्ध या भागानंतर लिहिला गेलेला असला तरी त्याचे विशेष महत्त्व आहे. एकाकाचा पुष्कळसा भाग हा खुद्द श्रीचक्रधरांनी कथन केलेला व त्यांच्या शिष्यांनी जसाच्या तसा कानामनात साठवलेला भाग आहे. एकाकी अवस्थेत भ्रमण करीत असताना श्रीचक्रधरांना आलेले विविध अनुभव त्यांनी आपल्या निरनिराळ्या शिष्यांना सांगितले होते. म्हाइंभटानी त्याच अनुभवांना येथे वाङ्मयीन रूप दिलेले आहे. ह्या लीळा श्रीचक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवणाऱ्या आहेत. तशाच तत्कालीन सामाजजीवनावरही प्रकाश टाकणाऱ्या आहेत.